MHNG180014422022

**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १६०/२०२२**
**सौ. मीना वि. दशरथ व इतर**
**<u>निशाणी क्र. २ वरील आदेश</u>**
**(उद्‌घोषणा दिनांक १९ डिसेंबर, २०२३)**

**१.** कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (कौ.हिं.म.सं.अ.२००५) मधील कलम २३ नुसार अर्जदार यांनी सदर अर्ज सादर केला असून त्याद्वारे मुळ अर्जावर न्यायनिर्णय होईपर्यंत संरक्षण आदेश व आर्थिक मदतीचे आदेश करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

**२.** अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, सध्या अर्जदार तिच्या वडीलांकडे दहेगाव, तह. कळमेश्वर, जि. नागपूर येथे राहते. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दि. २६.०६.२००६ रोजी रितीरिवाजानुसार झाले. लग्नापासुन त्यांना आर्यन नावाचा एक मुलगा व कु. सुकेशनी नावाची एक मुलगी आहे. मुलगा व मुलगी दोघेही गैरअर्जदार क्र. १ यांच्याकडे राहत आहे. लग्नानतंर अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा १६ वर्षे सुखाचा संसार सुरू होता. गैरअर्जदार क्र. १ ला दारू पिण्याचा, सट्टा खेळण्याचा शौक होता. परंतु अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे तिला कोणताही त्रास नव्हता. गैरअर्जदार क्र. १ ने रु. ३,००,०००/- चे कर्ज केले होते ही बाब अर्जदाराला माहीत झाले तेव्हापासुन अर्जदाराला गैरअर्जदार क्र. १ ने त्रास देणे सुरु केले. घरात चिड-चिड करणे, वेळप्रसंगी हातवर करणे, काडी उचलुन फेकणे इत्यादी प्रकारे त्रास देवु लागला. रू. ३,००,०००/- चे कर्ज झाल्यामुळे अर्जदार गैरअर्जदार क्र. १ ला घेवुन तिच्या माहेरी राहायला व तेथे काम करून गैरअर्जदार क्र. १ वरील कर्जाचा बोजा कमी

करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अर्जदाराने बचत गटाचे कर्ज उचलुन गैरअर्जदाराचे कर्जाची परतफेड केली. दरम्यानच्या काळामध्ये गैरअर्जदाराचा कामीनी नावाच्या महीलेशी मन जुळले व तो त्याच्या गावाला माहुरझरी येथे मुलांना घेवुन निघुन गेला. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारची बदनामी करू लागला, तिच्यावर पाळत ठेवतो, मुलांना भेटु देत नाही, तु धंदा करते, रंडी आहे, घरात येवु देत नाही व अर्जदाराल सोडचिठ्ठी दे असे म्हणतो. मुलं पाहीजे असेत तर कोर्टातुन घे अशा धमक्या गैरअर्जदार क्र. १ अर्जदाराला देत होता.

**३.** अर्जदाराचे कथन असे आहे की, गैरअर्जदारने जे कर्ज केले होते त्याची परतफेड करण्यासाठी ती माहेरी आली व त्यासाठी तिने काम केले, वडीलांजवळुन काही पैसे उसनवार केले, बचत गटाचे लोन उचलले व गैरअर्जदाराचा कर्जाचा बोजा कमी केला, कर्ज फिटल्यानंतर गैरअर्जदार त्याच्या घरी माहुरझरी येथे निघुन गेला व त्यानंतर त्याने तिला कधीही पैसे दिले नाही व लोनचे हप्तेही फेडले नाही. अर्जदाराने गैरअर्जदाराचे कर्ज फेडण्याकरीता रु. ३०,०००/- बचतगटाचे व रू. ४७,०००/- भीसी घेतली होती त्यामुळे गैरअर्जदाराने पैसे भरण्यास मदत करावी व तदनुषंगीक आरोप करत अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्याविरूध्द कौ.हिं.म.सं.अ., २००५ प्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यासाठी विनंती केली आहे.

**४.** गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. १० नुसार सादर केले असून त्यांनी अर्जातील त्यांच्या विरोधातील कथने नाकारलेली आहेत. त्यांनी अर्जदार यांच्या चारित्र्याविषयी आरोप केलेले आहेत. अर्जदार यांनी एका सचिन नावाच्या मूलासाठी गोळया खाल्या होत्या. यातून सचिनच्या पत्नीसोबत वाद निर्माण झाले होते. त्यांनी

गैरअर्जदार क्र. १ यांना अर्जदार यांचे वडिल त्यांचे घर दुस-याच्या नावावर करत असल्याचे कारण सांगून त्यांना व मूलांना तेथे नेले. तेथे ते ८ महिने राहिले त्या दरम्यान अर्जदार व त्यांचे वडिल यांनी दारुचा व्यवसाय सुरु केल्यामूळे त्याचा वाईट परिणाम सुरु झाला. अशा परिस्थितीत काही आणखी घटना नंतर गैरअर्जदार क्र. १ त्यांच्या मुलांसह त्यांच्या घरी राहण्यास गेले होते. अर्जदार यांनी त्यांच्यासोबत जाण्यास नकार दिल्यामूळे गैरअर्जदार क्र. १ यांनी दि. २८.०३.२०२२ रोजी दिलेल्या रिपोर्ट नंतर महिला समुपदेशन केंद्र, कळमेश्वर येथे अर्जदार व गैरअर्जदार यांचे बयाण घेण्यात आले त्यामध्ये अर्जदार यांनी त्यांच्या वडीलांची तब्येत ठीक होईपर्यत जाण्यास नकार दिला व गैरअर्जदार क्र. १ यांनी राहायला जाण्यासाठी मागणी केली. या कारणास्तव अर्जदाराची मागणी फेटाळूण लावण्याची विनंती गैरअर्जदार यांनी केली आहे.

**५.** अर्जदार यांच्यातर्फे सुविज्ञ वकील सौ. जे. आय. पवार व गैरअर्जदार यांच्यातर्फे सुविज्ञ वकील सौ. बी. डी. शेवाळे यांचा युक्तीवाद ऐकले. माझ्या समक्ष पुढील मुद्‌दे उपस्थित होतात. त्यांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र** | **... मुद्‌दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी अर्जदारांविरूध्द कौटुंबिक हिंसाचार केला आहे किंवा करत आहेत असे अर्जदार प्रथम दर्शणी सिध्द करतात काय? | ... अंशतः होय. |
| २. | अर्जदार या अंतरिम आदेश करून मिळणेस पात्र आहेत काय? | ... अंशतः होय. |

| | | |
|---|---|---|
| २-अ. | होय असेल तर कोणत्या प्रकारचे आदेश ? | ... केवळ मासिक उदरनिर्वाह भत्ता. |
| २-ब. | आर्थिक आदेशाच्या बाबतीत प्रमाण काय असावे? | ... अर्जदार यांना रू. ८००/- प्रति माह आदेशाच्या तारखेपासुन. |

## कारणमिमांसा

**६.** नातेसंबंध अविवादीत आहेत. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांची मूले गैरअर्जदार यांच्या सोबत राहत आहेत. ही बाब अविवादीत आहे.

**मुद्दा क्र. १ बाबत**

**७.** कौटुंबिक हिसांचार प्रतिबंधक अधिनियम, २००५ चे कलम ३ नुसार कौटुंबिक हिसांचाराची व्याप्ती लक्षात घेता पत्नीला आर्थिक मदत न करणे अथवा त्यांच्या खर्चासाठी पैसे न देणे या गोष्टी देखील कौटुंबिक हिसांचार अंतर्गत येतात. याचा विचार करता प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये दोन्ही पक्षांची कथने लक्षात घेता पती या नात्याने गैरअर्जदार क्र. १ हे अर्जदार यांना आर्थिक मदत करत नाहीत अथवा त्यांना खर्चासाठी पैसे देत नाहीत या बाबीदेखील कौटुंबिक हिसांचार या सदराखाली येतात. गैरअर्जदार यांच्यातर्फे अर्जदार क्र. १ यांचेवर करण्यात आलेले आरोप व त्या दारुचा व्यवसाय करुन त्यांची उपजीविका भागवु शकत असल्याबाबतची कथने सिध्द होण्यासाठी त्यांनी मुळ अर्जामध्ये पुरावा देणे आवश्यक आहे. सध्या सकृतदर्शनी त्यांची

कुठलीही जबाबदारी पार पाडत नाही असे उपलब्ध अभिलेखावरून दिसुन येते. त्याचप्रमाणे त्यांच्या म्हणण्यामध्ये त्यांनी अर्जदार ही कमवु शकते म्हणुन तीच्या बाबतची जबाबदारी पार पाडण्यास समर्थ असल्याबाबतचे कथन केलेले आहे. त्यावरून असे दिसुन येते की अप्रत्य क्षरित्या ते अर्जदार हिच्याबाबतची जबाबदारी घेण्याचे टाळत आहेत. त्यांनी अर्जदार हिच्याविषयी असणारी त्यांची जबाबदारी टाळणे हे कौ. हिं.म.सं.अ.,२००५ या कायदयास अभिप्रेत नाही व ही कृती अथवा अकृती या कायदयातील भावनीक, आर्थिक हिंचाचाराच्या व्याखेत बसणारे कृत्य आहे. त्यापुढेही असे करणे हे नितीमत्ता व सामाजीक शिस्तीच्या विरोधात आहे. त्यामुळे अर्जदार यांच्यावर गैरअर्जदारांमार्फत आर्थिक व भावनीक हिंचारात झाल्याचे सकृतदर्शणी झाल्याचे दिसुन येत आहे.

८. इतर गैरअर्जदार यांच्याबाबत अर्जदार यांनी केलेले आरोप हे पुराव्याद्वारे सिध्द झाल्याशिवाय त्याबाबत सकृतदर्शनी पुराव्याच्या अभावी भाष्य करता येणे शक्य नाही. त्यामुळे सकृतदर्शनी त्यांच्या विरूध्द कौटुंबिक हिसांचाराबाबत पुरावा नसल्यामुळे त्यांच्या विरूध्द अंतरिम आदेश देणे योग्य होणार नाही. आर्थिक, भावनीक व्यतिरिक्त इतर कुठल्याही प्रकारचा कौटुंबिक हिसांचार झाल्याबाबत अभिलेखावरून सकृतदर्शनी म्हणता येत नाही. त्यामुळे या मुद्दयास गैरअर्जदार क्र. १ यांच्या हद्दीपर्यंत होकारार्थी निष्कर्ष नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>**

९. गैरअर्जदार क्र. १ यांना असे शारिरीक अथवा मानसिक अपंगत्व नाही जेणेकरून ते कमावु शकणार नाहीत असे दोन्ही पक्षांच्या कथानांवरून सकृतदर्शनी दिसुन येते. अर्जदार या कमावत्या

आहेत याबाबत कुठल्याही प्रकरचा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर नाही. अर्जदार या अंतरिम उदरनिर्वाह भत्ता मिळण्यास अपात्र आहेत असे दर्शविणारी कुठलीही बाब अभिलेखावर नाही. त्यामुळे या मुद्दयास मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. २–अ बाबत</u>**

**१०.** अर्जदार यांचेतर्फे केवळ आर्थिक स्वरूपाचा कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. मात्र इतर कुठल्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सकृतदर्शनी आढळुन येत नाही. त्यामुळे त्याबाबत आदेश देणे उचित होणार नाही. त्यामुळे अर्जदार यांना मासिक उदरनिर्वाह भत्ता व्यतिरीक्त इतर कुठलाही आदेश अंतरिम स्वरूपात देणे योग्य होणार नाही. या मुद्दयास मी त्याप्रमाणे निष्कर्ष नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. २–ब बाबत</u>**

**११.** आर्थिक आदेशाचे प्रमाण निश्चित करतेवेळी सर्वात महत्वाची बाब म्हणजे अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांची लहान मुले गैरअर्जदार यांच्या सोबत राहतात. ही आहे. अर्जदार यांच्यातर्फे गैरअर्जदार क्र. १ यांचे उत्पन्न सकृतदर्शनी सिध्द करण्यात आलेले नाही. लहान मुलांच्या वाढ व विकासावर गैरअर्जदार यांना जास्तीत जास्त खर्च करता येणे हे न्यायोचित आहे. प्रकरणाचे स्वरूप व दोन्ही पक्षांची कथने लक्षात घेता, अर्जदार यांच्या राहण्याचे ठिकाण, जीवणावश्यक वस्तुंच्या किमंती त्याचप्रामाणे गैरअर्जदार यांचे नेमके उत्पन्न सिध्द व्हावयाचे आहे या बाबी लक्षात घेता अर्जदार यांना रू. ८००/- प्रतिमाह एवढा उदरनिर्वाह भत्ता देणे योग्य राहील असे माझे

मत आहे. अर्जदार यांच्या विरोधातही गंभीर आरोप आहेत. त्यांची मुले गैरअर्जदार यांच्या कडे राहत आहेत. लग्नानंतर त्यांनी पूर्ण वेळ त्यांच्या वडिलांची सेवा करण्यात घालविले नैतिक दृष्टया अयोग्य असून ज्यांनी पत्नी व आई म्हणून त्यांची जवाबदारी पार पाडण्याकडे दुर्लक्ष केलेले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या विडलांनी देखील त्यांनी त्यांच्या सासरकडील जवाबदारीविषयी सांगितल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत नाही, गैरअर्जदार क्रमांक १ यांनी अर्जदार यांच्या विरुध्द अर्ज केलेला असून अर्जदार यांनी त्यांच्या सोबत जाण्यास नकार दिलेला आहे या कारणांस्तव त्यांना अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम उदरनिर्वाह भत्ता मंजूर करणे योग्य होणार नाही हे लक्षात घेउन मी पुढील आदेश पारीत करतो.

**आदेश**

**१.** अर्ज खर्चासह अंशतः मंजुर करण्यात येतो.

**२.** कौ.हिं.म.सं.अ.,२००५ चे कलम २३ अन्वये गैरअर्जदार क्र. १ यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी आदेशाच्या तारखेपासुन अर्जदार यांना रू. ८००/-प्रतिमाह ही रक्कम अंतरिम उदरनिर्वाह भत्ता म्हणुन या प्रकरणामध्ये न्यायनिर्णय होईपर्यंत दयावी.

(आदेश खुल्या न्यायालयात श्रृतलेखीत व उद्घोषित करण्यात आला.)

**स्वा/-**
**( यो. सु. कवडे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**(न्यायालय क्र. १) कळमेश्वर,**
**नागपूर**

**ठिकाण : कळमेश्वर**
**दिनांक : १९ डिसेंबर,२०२३**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment are same word to word, as per the original Judgment.

Name of the Stenographer :-R. S. Daware (Gr. III)